# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

**MARATHI**

*India's National Spiritual Newspaper* ₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVIII — YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2026 MARCH — No. 02


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

**स्तोत्रसंहिता ४:१-८**

१. मी हाक मारतो तेव्हा मला उत्तर दे, हे माझ्या न्यायीपणाच्या देवा, संकटात मी होतो तेव्हा तू मला मुक्त केले; माझ्यावर दया कर आणि माझी प्रार्थना ऐक.

२. अहो मनुष्यांच्या मुलांनो, कोठपर्यंत माझे गौरव अपमान असे केले जाईल? कोठपर्यंत तुम्ही व्यर्थतेची आवड धराल आणि लबाडी शोधाल?

३. परंतु तुम्ही हे जाणा की यहोवाने भक्तिमानाला आपणासाठी निराळे करून ठेवले आहे; मी यहोवाला हाक मारीन तेव्हा तो ऐकेल.

४. धाक धरा आणि पाप करू नका; आपल्या खाटेवर तुम्ही आपल्या हृदयाशी संभाषण करा, आणि शांत राहा.

५. न्यायीपणाचे यज्ञ अर्पण करा, आणि यहोवावर भरवसा ठेवा.

६. कोण आम्हांला कल्याण दाखवील? असे म्हणणारे पुष्कळ आहेत; हे यहोवा, तू आपल्या मुखाचा प्रकाश आम्हांवर पाड.

७. त्यांचे धान्य व त्यांचा नवा द्राक्षारस ही विपुल होतात तेव्हा त्यांना जो आनंद असतो त्यापेक्षा अधिक आनंद तू माझ्या हृदयात घातला आहे.

८. स्वस्थपणे मी अंग टाकीन आणि झोपीही जाईन; कारण हे यहोवा, केवळ तूच मला मी निर्भयपणात राहावे असे करतोस.

# देवाच्या उपस्थितीत तुम्हांला आशीर्वादित शांती लाभेल!

**YOU WILL HAVE BLESSED PEACE IN GOD'S PRESENCE!**

- *सिस्टर* अँजेलिन



आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या मौल्यवान नावात **एको ऑफ हिज कॉल** या विस्तारित कुटुंबाला मनःपूर्वक शुभेच्छा! तुमच्यापैकी प्रत्येक जण सर्व बाबतीत समृद्ध होत राहावा, जशी तुमचा आत्मा ख्रिस्तामध्ये समृद्ध होत आहे, हीच माझी मनापासूनची प्रार्थना आहे.

या महिन्यात साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त, आमच्या सर्व आदरणीय महिला वाचकांना हार्दिक शुभेच्छा व देवाचे आशीर्वाद असोत. तुम्हांला चांगले आरोग्य, नूतनीकृत सामर्थ्य आणि प्रभूची विपुल कृपा प्राप्त होवो. माझी प्रार्थना हीच आहे की, देव सतत आपल्याला त्याच्या वचनात दाखविलेल्या पाच शहाण्या स्त्रियांप्रमाणे बनण्यास मदत करो, ज्या आपल्या घरांची उभारणी करतात, आपल्या कुटुंबांचे पोषण करतात, आणि देवाच्या प्रेमाची अत्यंत गरज असलेल्या या जगात प्रकाशासारख्या चमकतात. आपण ज्ञानात चालत राहूया, प्रतिष्ठा व सामर्थ्याने अलंकृत होऊन, जे काही आपण करतो त्यामध्ये ख्रिस्ताचे सौंदर्य प्रकट करूया.

### विश्रांतीचे वरदान : आपल्या जीवनासाठी देवाची योजना!

स्त्रियांच्या एकाच वेळी अनेक जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडण्याच्या अद्भुत क्षमतेवर मनन करताना, माझे विचार माझ्या आई आणि आजीवर स्थिरावले - या दोन असामान्य स्त्रिया, ज्यांनी त्यांच्या कुटुंबांसाठी आणि माझ्या वडिलांच्या सेवाकार्यासाठी अनेकदा विश्रांती

(...पान ३ वर)




## एको ऑफ हिज कॉल

**यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !**

**पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत**

सहभागी होण्याची संधी

*पाच मिनिटांचा संदेश*

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून

रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

✻ कृपा करुन सबक्राईब करा ✻

# ECHO OF HIS CALL - (Marching towards 60th year)

Estd. 1969



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



> ''खरेपण व सरळपण मला राखोत, कारण मी तुझी प्रतीक्षा करतो''
>
> - स्तोत्र २५:२१

**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


**HON. EDITOR-IN-CHIEF**

Rev. Dr. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.

**EX MANAGING EDITOR**

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**GENERAL MANAGER**

Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.

**ADMINISTRATION**

Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)

**EDITORIAL BOARD**

Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.



**EDITOR, PUBLISHER & PRINTER**

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858 95661 31858

**E.MAIL**

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org

**YOUTUBE CHANNEL**

Echo of His Call


प्रभू येशू ख्रिस्तामध्ये प्रिय आणि अत्यंत जिव्हाळ्याचे मित्रहो,

देवाने त्याच्या कृपेने आपल्याला २०२६ मध्ये मार्च महिन्यात प्रवेश करण्यास सक्षम केले आहे. मागील काही महिने कठीण व आव्हानात्मक असले तरी, त्याची कृपा आपल्यासाठी नेहमीच पुरेशी ठरली आहे आणि ती आजही तितकीच पुरेशी आहे.




*सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूल- क्रिडा दिवस.*

प्रभूने आमच्या शाळेला समर्पित शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांच्याद्वारे आशीर्वादित केले आहे. आम्ही ३० जानेवारी २०२६ रोजी आमचा २८ वा वार्षिक क्रीडा दिन साजरा केला.

डॉ. प्रेमचंद हे आमचे प्रमुख पाहुणे होते, आणि संपूर्ण दिवस वेगवेगळ्या उत्साही खेळांनी भरलेला होता. अनेक पालक आमच्यासोबत सहभागी झाले आणि मुलांनी सादर केलेल्या उत्कृष्ट कौशल्य व शिस्तीचे त्यांनी उत्साहाने कौतुक केले.

आमच्या देशासाठी आणि जगासाठी जबाबदार नागरिक घडविण्याची क्षमता आम्हाला दिल्याबद्दल आम्ही देवाचे आभारी आहोत. आमचे विद्यार्थी एप्रिल २०२६ मध्ये नियोजित असलेल्या शासकीय परीक्षांसाठी सध्या तयारी करत आहेत. आमच्या ग्रामीण इंग्रजी माध्यमाच्या हायस्कूलसाठी **(सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन हायस्कूल)** अधिक समर्पित शिक्षक



*आमच्या प्रमुख मंडळीतील बंधूंचे शिबीर- ''जोशुआ वॉरिअर टीम''.*


**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ◘ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ◘ YouTube Ministry ◘ Online Courses ◘ Theological Correspondence Courses (2 languages) ◘ Church Planting ◘ Nehemiah Bible Colleges ◘ Gospel Printing Press ◘ Great Commission Partners ◘ St. Paul's Matriculation School ◘ Crusades ◘ Community Development

आणि कर्मचारी मिळावेत यासाठी आपण मनापासून प्रार्थना करावी अशी आम्ही कळकळीची विनंती करतो.

**जोशुआ वॉरियर्स** या सदराखाली आमच्या मुख्य मंडळीतील पुरुषांसाठी आम्ही एक सुंदर एकदिवसीय आध्यात्मिक शिबीर आयोजित केले होते. २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत झालेल्या या शिबिरात सुमारे ७० समर्पित पुरुषांनी सहभाग घेतला. उपस्थित प्रत्येकावर प्रभूचे सामर्थ्य प्रकट झाले, आणि प्रत्येकाला देवाच्या विशेष स्पर्शाचा अनुभव आला.

प्रभूने मार्गदर्शन करणाऱ्या प्रवक्त्यांना विपुलपणे आशीर्वादित केले, आणि सहभाग करणारे सर्वजण भारतात सुवार्ता पोहोचविण्याच्या नव्या दृष्टीने व समर्पित भावनेने परतले.

असेच एक कुटुंबीय शिबीर लवकरच आयोजित करण्याचे आम्ही नियोजन करीत आहोत. योग्य वेळ, ठिकाण आणि सेवकांविषयी देवाचे मार्गदर्शन लाभावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

## आमची इतर सेवाकार्ये

**नहेम्या बायबल कॉलेजेस** आणि आमच्या मासिक प्रकाशनांसह आमच्या सर्व सेवाकार्यांवर प्रभूची अखंडपणे कृपा आहे.

**नहेम्या बायबल कॉलेजेसचा पुढील पदवीदान समारंभ** ४ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला आहे. पुढील शैक्षणिक वर्षासाठीचे वर्ग जून २०२६ च्या पहिल्या आठवड्यात सुरू होतील. आमच्या कॉलेजमध्ये समर्पित नवे विद्यार्थी प्रभूने पाठवावेत यासाठी आपण प्रार्थना करा. आम्ही प्रदान करतो:

**धर्मशास्त्रातील प्राथमिक कोर्स (डिप्लोमा इन थिऑलॉजी)**
**धर्मशास्त्रातील पूर्ण पदवी कोर्स (बॅचलर ऑफ थिऑलॉजी)**

हे अभ्यासक्रम तामिळ, इंग्रजी आणि हिंदी भाषांमध्ये उपलब्ध आहेत. आमच्या समर्पित अध्यापकवर्गासाठी व प्रशासनिक कर्मचाऱ्यांसाठीही आम्ही प्रार्थनेची विनंती करतो.

मिशन क्षेत्रात सेवा करणाऱ्या आमच्या सर्व सेवकांसाठी तसेच प्रशासनिक विभागांतील सर्व कर्मचाऱ्यांसाठी आम्ही देवाचे आभार मानतो.

आम्ही तुमच्यासाठी सातत्याने प्रार्थना करीत आहोत, आणि आमच्या सेवाकार्यासाठी तुमच्या प्रार्थना व सहकार्याची विनंती करतो.

देवाची कृपा तुम्हां सर्वांवर असो.

येशू ख्रिस्तामधील तुमचा सेवक,

**पास्टर एस्. सॅम सेल्व राज,**
E.mail: sam@echoofhiscall.org

(पान १ वरून...)

न घेताच अथक परिश्रम केले. त्यांची निष्ठा मला एक गहन सत्य समजावून सांगणारी ठरली: विश्रांती किती महत्त्वाची आहे.

जरी मी मुख्यतः स्त्रियांचाच संदर्भ घेत आहे, तरी पुरुषही विश्रांतीच्या संकल्पनेशी संघर्ष करतात. ते आपल्या कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नियमित परिश्रम करतात, तसेच कामाशी संबंधित आणि घरगुती जबाबदाऱ्या सांभाळतात. आजच्या वेगवान, सतत ''गतीशील'' जगात, विश्रांती ही अशी विलासिता वाटते जी कुणालाच परवडत नाही. त्यात आपली मुलेही ओढली जात आहेत – शाळेतील अभ्यास, अतिरिक्त अभ्यास वर्ग आणि सातत्यपूर्ण परीक्षा यांमुळे त्यांचे वेळापत्रक भरून गेले आहे.

तथापि, पवित्रशास्त्र आपल्याला एक सामर्थ्यशाली सत्य दाखवते – सहा दिवस सृष्टीची निर्मिती केल्यानंतर देवाने स्वतः **सातव्या दिवशी विश्रांती घेतली** (उत्पत्ती २:२). जेव्हा संपूर्ण विश्वाचा सृष्टिकर्ता स्वतः विश्रांती घेतो, तेव्हा आपल्याला किती अधिक विश्रांतीची आवश्यकता आहे! तरीही, आपल्यापैकी अनेकांना असे वाटते की, दिवसात वेळच अपुरा पडतो. घर, नोकरी आणि सेवाकार्याच्या अपेक्षा अनेकदा सतत आणि न थांबणाऱ्या वाटतात. मी अनेकदा लोकांना असे म्हणताना ऐकले आहे, देवासाठी विश्रांती घेणे सोपे होते; तो देव आहे! माझे काम मात्र कधीच संपत नाही. तो विचार समजण्यासारखा असला तरी, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे: विश्रांती ही देवाने आपल्या मानवी जीवनशैलीचा एक भाग म्हणूनच ठरवली आहे.

काळाच्या ओघात आपण त्याच्या त्या भागापासून दूर गेलो आहोत. आज आपण झोपेचा त्याग करतो, जेवण टाळतो, आणि जीवनाच्या मागण्या पूर्ण करण्याच्या नादात डोके नसलेल्या कोंबड्यांसारखे अविरत धावत राहतो. मात्र देवाचे वचन आपल्याला पुन्हा त्याच्या कृपामय जीवनलयीकडे परत बोलावते. विश्रांती म्हणजे आळशीपणा नव्हे; ती आज्ञाधारकता आहे. ती विश्वासाची कृती आहे, जी असे म्हणते: ''प्रभु, मी विश्वास ठेवतो की, सर्व काही तुझ्या नियंत्रणात आहे, जरी मी थांबतो, तरी.''

विश्रांतीबद्दल बायबल काय सांगते आणि आपण तिला स्वीकारण्यात इतका संघर्ष का करतो याचा आपण अभ्यास करूया. आपण थोडा विसावा घ्यायला, मन शांत करायला आणि त्याच्या

## अत्यंत महत्त्वाची सूचना!




नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरू ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉटस एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉटस एप संदेशाद्वारे तावडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते!

**आमचा पत्ता:**

**एको ऑफ हीज कॉल**
**१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६०००० ५, भारत**
**Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org**

सान्निध्यात नवसंजीवनी मिळवायला शिकू या, **कारण त्याच्यातच आपल्या आत्म्यांना खरी विश्रांती मिळते** (मत्तय ११:२८).

## विश्रांतीचे सामर्थ्य!

### १. विश्रांती ही आपल्या जीवनासाठी देवाची लय आहे!

**''आणि देवाने आपले काम, जे त्याने केले होते, त्या आपल्या सर्व कामापासून त्याने सातव्या दिवशी विसावा घेतला. आणि देवाने सातव्या दिवसाला आशीर्वाद दिला, आणि तो पवित्र केला, कारण देवाने जे अस्तित्वात आणले होते आणि केले होते त्या आपल्या सर्व कामापासून त्या दिवशी त्याने विसावा घेतला''** - उत्पत्ती २:२-३.

देवाने शब्बाथ हा एक वरदान म्हणून निर्माण केला. विश्रांती ही उपासनेची एक कृती आहे; देवाजवळ येण्यासाठी, त्याचे वचन वाचण्यासाठी, मनन करण्यासाठी, प्रार्थना करण्यासाठी आणि त्याच्या सहभागितेचा आनंद घेण्यासाठी दिलेला पवित्र काळ. जेव्हा आपण त्याच्यामध्ये विश्रांती घेतो, तेव्हा आपण शारीरिक, मानसिक, भावनिक आणि आत्मिकदृष्ट्या नव्याने ताजेतवाने होतो.

जर आपण विश्रांतीकडे दुर्लक्ष केले, तर आपल्याला पूर्ण थकवा येणे अपरिहार्य ठरतो. देवाने विश्रांतीचा कित्ता घालून दिला तो थकवा आल्यामुळे नव्हे, तर त्याने जीवनाची जी लय बांधली आहे त्याचे अनुसरण करण्यासाठी. विश्रांती हा पर्याय नाही, तर तो जीवनासाठी देवाच्या दैवी रचनेचा एक भाग आहे.

### २. विश्रांती म्हणजे केवळ स्वतःला सावरणे नव्हे, तर तयारी आहे!

विश्रांती दुर्लक्षित केली गेली, तर ती सक्रिय शिस्त न राहता, अतिशय थकव्यापासून सावरण्याचा केवळ शेवटचा उपाय ठरते. येशू ख्रिस्ताने हे तत्त्व स्पष्टपणे समजून घेतले होते. सेवाकार्याच्या जबाबदाऱ्यांनी तो भारावून जाण्यापूर्वी, अनेकदा एकांत स्थळी जाऊन तो प्रार्थना करीत असे.

**''मग तो मोठ्या पहाटेस, रात्र असताच, उठून बाहेर गेला व रानातल्या जागेत जाऊन त्याने तेथे प्रार्थना केली''** - मार्क १:३५.

**''पण तो रानामध्ये एकीकडे जाऊन प्रार्थना करीत असे''** - लूक ५:१६.

येशू ख्रिस्ताने त्याच्या पित्याबरोबर घालवलेला वेळ उद्देशपूर्ण आणि सक्रिय होता. त्याला हे माहीत होते की, आत्मिक सामर्थ्य देवाशी नियमित संगतीतूनच प्रवाहित होते.

## अतिथकवा: विश्रांतीकडे दुर्लक्ष करण्याची किंमत!

विश्रांतीचा अभाव पूर्ण थकव्याकडे नेतो; हा संघर्ष आज आपल्यापैकी अनेकजण अनुभवत आहेत. जेव्हा आपण देवाने ठरवलेल्या विश्रांतीच्या लयीकडे दुर्लक्ष करतो, तेव्हा आपण शारीरिक, भावनिक आणि आत्मिकदृष्ट्या पूर्णपणे शक्तिहीन होतो. आणि जेव्हा आपण पूर्णपणे थकून जातो, तेव्हा देवाच्या राज्यात प्रभावीपणे सेवा करू शकत नाही.

विश्रांती स्वार्थ नाही; ती देवाने दिलेल्या आपल्या जीवनाचे आणि ''सेवा पाचरणाचे'' योग्य व्यवस्थापन आहे. पूर्ण थकवा अचानक येत नाही; चुकीची प्राधान्ये, चुकीची ओळख आणि चुकीची संगत आपल्या जीवनावर हावी होऊ लागली की तो हळूहळू वाढत जातो. या बाबी आपण तपासून पाहूया आणि देव आपल्या प्रेमातून आपल्याला नवीकरणासाठी त्याच्या रचनेकडे कसे परत बोलावतो हे समजून घेऊया.

### १. चुकीची प्राधान्ये!

आपण क्षमतेपेक्षा अधिक परिश्रम केल्यास अनेकदा अतिथकव्याचा कडेलोट सुरू होतो. सर्व काही महत्त्वाचे वाटते म्हणून आपण प्रत्येक गोष्टीला हो म्हणतो. तथापि, शहाणपण आपल्याला प्राधान्ये ठरवायला शिकवते. नाही म्हणायला शिकणे हा स्वार्थीपणा नाही, तर ती गरज आहे.

येशू ख्रिस्ताने सुद्धा समतोलपणा राखण्याची गरज ओळखली होती: **''आणि तो त्यांना म्हणाला, तुम्ही एकीकडे रानातल्या जागेत चला, व थोडा वेळ विसावा घ्या. कारण पुष्कळ लोक तेथे येत जात होते, आणि त्यांना जेवायला देखील अवकाश मिळेना''**- मार्क ६:३१.

लूक १० मध्ये आपण पाहतो की, येशू ख्रिस्त मार्था आणि मरीया यांच्या घरी गेला. मार्थाने त्यांचे आणि त्यांच्या शिष्यांचे मनापासून स्वागत केले, आणि पाहुणचार करण्यात ती साहजिकच व्यस्त होती. मंडळीमध्ये निष्ठेने पाहुणचार करणाऱ्या आणि इतर असे अनेक सेवाकार्य करणाऱ्या सेवकांसाठी आम्ही देवाचे आभार मानतो. मात्र, मार्था गोंधळून व व्याकुळ झालेली असताना, मरीयेने येशूच्या पायांशी बसून त्याचे ऐकण्याची निवड केली.

मार्थाने ''हो'' म्हटले होते, पण आता ती तिच्या जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली संघर्ष करीत होती. आपल्यापैकी किती जण याच्याशी स्वतःला जोडून घेऊ शकतो? आपण चांगल्या उद्देशाने हो म्हणतो खरे,

(...पान ८ वर)

**Statement about ownership and other particulars about the Newspaper Echo of His Call (Marathi) - Form IV**
**(See Rule 8)**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | : | **New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai - 600 005.** |
| 2. Periodicity | : | **Monthly** |
| 3. Printer, Editor, Owner & Publisher | : | **S. Sam Selva Raj** (Same Address) |
| 4. Nationality | : | **Indian** |

I, **S. Sam Selva Raj** hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**March 2026** **S. Sam Selva Raj.**

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ फेब्रुवारी, २०२६ पासून ते १८ मार्च, २०२६

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✞ याकरीता देवाची स्तुती करा...

**१९ फेब्रुवारी -** आमच्या **एको ऑफ हिज कॉल** यूट्यूब चॅनेलचे अखंड प्रसारण करण्यात मदत करणारी एक विलक्षण मीडिया टीम यासाठी देवाची स्तुती करा.

**२० फेब्रुवारी -** आमच्या सहभागीदारांच्या नैतिक आणि आर्थिक पाठिंब्यामुळे देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२१ फेब्रुवारी -** आमचे २०२६ चे मासिक कॅलेंडर आणि अभिवचन पत्रिका यांची छपाई व वितरण करण्याचे कार्य पूर्ण करण्यासाठी देवाने आम्हाला कृपा पुरवली यासाठी देवाची स्तुती करा.

**२२ फेब्रुवारी -** **नहेम्या बायबल कॉलेज** आणि **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलमधील** आमच्या विशेष ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या कार्यक्रमांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२३ फेब्रुवारी -** आमच्या सर्व मंडळीच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी तरुणांना देवाने उत्साहरुपी आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२४ फेब्रुवारी -** आमच्या **मीडिया मिनिस्ट्रीला** तसेच **एको ऑफ हिज कॉल** या यूट्यूब चॅनेलला देवाने आशीर्वादित केले व ज्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाही अशा बहुभाषिक लोकांपर्यंत पोहोचण्याची कृपा देवाने पुरवली यासाठी देवाची स्तुती करा.

**२५ फेब्रुवारी -** आमच्या प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यता घेणारे सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, आणि महान सेवाकार्याचे सहभागीदार आणि त्या सर्वांचे कुटुंबीय यांना देवाने त्याची कृपा पुरवली यासाठी देवाची स्तुती करा.

**२६ फेब्रुवारी -** आमच्या मंडळीच्या सेवेला अधिक संघटित पद्धतीने काम करण्यासाठी दिवसाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२७ फेब्रुवारी -** आमचे ज्येष्ठ पाळक एस. सॅम सेल्वा राज आणि कुटुंबीय यांचे सर्व वाईट शक्तींपासून देवाने संरक्षण केले यासाठी देवाची स्तुती करा.

**२८ फेब्रुवारी -** आमच्या **एको ऑफ हिज कॉल** या सेवेमधील कर्मचारीवर्ग आणि त्यांच्या कुटुंबीयांना उत्तम आरोग्य व दैवी संरक्षणाने देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

**०१ मार्च -** आमच्या **बायबल कॉरस्पॉन्डन्स कोर्सची** आणि **थिऑलॉजिकल कॉरस्पॉन्डन्स कोर्स** या अभ्यासक्रमांची देव वाढ करत आहे यासाठी देवाची स्तुती करा.

**०२ मार्च -** आमची प्रमुख मंडळी आणि इतर आमच्या मंडळीच्या शाखांच्या रविवारच्या उपासनामध्ये देवाने त्याच्या वचनाचे सामर्थ्य प्रकट केले यासाठी देवाची स्तुती करा.

**०३ मार्च -** आमच्या प्रिंटिंग प्रेसमध्ये १६ भाषांमध्ये आमचे मासिक छापून प्रकाशित करण्यास आणि ते मिशन क्षेत्रात पाठवण्यास देव आम्हांस सक्षम करतो यासाठी देवाची स्तुती करा.

**०४ मार्च -** आमच्या **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलचे** मुख्याध्यापक, शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

## ✞ कृपया यासाठी प्रार्थना करा...

**०५ मार्च -** ख्रिस्ती प्रचारकांनी देवाचे वचन कोणतीही भेसळ न करता शुद्ध व परिपूर्ण रीतीने प्रचार करावे यासाठी प्रार्थना करा.

**०६ मार्च -** २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी आमच्या निवासी आणि संध्याकाळच्या **नहेम्या बायबल महाविद्यालयांसाठी** पात्र विद्यार्थ्यांचा प्रवेश व्हावा यासाठी कृपया प्रार्थना करा.

**०७ मार्च -** आमच्या **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलमध्ये** २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी कृपया प्रार्थना करा.

**०८ मार्च -** राष्ट्रांमधील मुले आणि तरुणांनी येशू ख्रिस्ताला त्यांचा वैयक्तिक तारणहार म्हणून स्वीकारावे यासाठी प्रार्थना करा.

**०९ मार्च -** आमचे सहाय्यक संपादक आणि त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी प्रार्थना करा.

**१० मार्च -** वृद्धाश्रमातल्या वृद्धांच्या आरोग्य आणि शांती यासाठी प्रार्थना करा.

**११ मार्च -** आमच्या **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलच्या** दहावीच्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या अंतिम परीक्षेत उत्कृष्ट निकाल लागावा यासाठी प्रार्थना करा.

**१२ मार्च -** आमच्या **एको ऑफ हिज कॉलच्या** यूट्यूब शॉर्ट्सद्वारे अजूनही पोहोचू न शकलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी देवाने त्याची कृपा पुरवावी यासाठी प्रार्थना करा.

**१३ मार्च -** आमच्या **नहेम्या बायबल कॉलेजच्या** विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या पदवी संपादन करावी यासाठी प्रार्थना करा.

**१४ मार्च -** आमच्या प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यता घेणारे सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, आणि महान सेवाकार्याचे सहभागीदार आणि त्या सर्वांचे कुटुंबीय यांच्या उन्नतीसाठी देवाने कृपा पुरवावी यासाठी प्रार्थना करा.

**१५ मार्च -** युद्धापासून जगातील देशांना दैवी संरक्षण लाभावे यासाठी प्रार्थना करा.

**१६ मार्च -** जगभरातील देवाची सेवा करणाऱ्या सेवकांना देवाचे संरक्षण लाभावे यासाठी प्रार्थना करा.

**१७ मार्च -** सर्व देशांवर आणि त्यांच्या आर्थिक विकासावर त्याचा आशीर्वादाचा हात असावा यासाठी प्रार्थना करा.

**१८ मार्च -** आमचे ज्येष्ठ पाळक एस. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे सर्व प्रकारच्या वाईट शक्तींपासून संरक्षण व्हावे यासाठी प्रार्थना करा.

## जर ख्रिस्ती नाही - तर जग सुद्धा नाही

**शोधकर्ते:**

| | |
|---|---|
| सायकल | = मॅक मिलान. |
| बाईक | = जे. डेलर. |
| ऑटो | = जोनाथन स्कॉबी. |
| कार | = कार्ल बेंझ. |
| मोटार कार | = ऑस्टिन. |
| जीप | = डब्लू. एल. झेडसन. |
| बस | = गोल्ड बास. |
| विमान | = राईट ब्रदर्स. |
| रेल्वे | = रिचर्ड ट्रिविटिक. |
| ट्रॅक्टर | = जॉन फ्रॉक्लिच. |
| जेसिबी | = जोसेफ सी. बॅमफोर्ड. |
| बॅटरी | = ए. वॉल्ट. |
| विद्युत् | = बेन्जामिन फ्रँकलिन. |
| बल्ब | = थॉमस ए. एडिसन. |
| विजेची यंत्रणा (डायनॅमो) | = एम. फॅरेडे. |
| गॅस इंजिन | = डाइमियर. |
| डिझेल इंजिन | = आर. डिझेल. |
| वेल्डर | = एटिश थॉमसन. |
| रेल्वे इंजिन | = स्टीफनसन. |
| एलपीजी गॅस | = डॉ. वॉल्टर डी.एस. |
| माइक | = हॉरस शॉर्ट. |
| पेन | = लुईस वेअरमन. |
| इस्त्री | = एच. डब्ल्यू. सुले. |
| माचिस | = जॉन वॉकर. |
| कॅमेरा | = जॉन कार्बेट. |
| डिजिटल कॅमेरा | = स्टीवन. |
| रेझर | = किंग्स जे. जिलेट. |
| रबर | = सी. गुड ईअर. |
| फ्रिज | = जेम्स हॅरिसन, अलेक्झांडर किट्सिन. |
| सेफ्टी पिन | = वॉल्टर हंट. |
| सिलाई मशीन | = बार्थालोम टायमोनिव. |
| लेन्स | = वेनिस (व्हिन्सी). |
| चष्मा | = साल्विनो डी. ए. |
| टीव्ही | = बायरड, जॉन लोगी. |
| फोन | = अलेक्झांडर ग्रॅहम बेल. |
| कंप्युटर | = चार्ल्स बाबेज. |
| मोबाइल | = मार्टिन. कूपर. |
| एस डी कार्ड | = रोलंड मोरेनो |
| पेंट्स | = शालीमार |
| स्टील | = हेन्री बेस्मार |
| सिमेंट | = जोसेफ अस्पदीन |
| टाईल्स | = जर्मन मिशनरी. |
| टॉयलेट | = थॉमस क्रॅपर. |
| पॅंट | = जॉर्ज ब्रायन. |
| शर्ट | = बियॉन्से. |
| जीन्स पॅंट | = जेकब डेव्हिस. |
| ब्रा | = मारी ट्युकॉक. |
| क्रिकेट | = डब्ल्यू. जे. ग्रेस. |
| व्हॉलीबॉल | = मॉर्गन विल्सन. |
| फुटबॉल | = रॉबर्ट केन. |
| पेनिसिलीन | = अलेक्झांडर फ्लेमिंग. |
| प्लास्टिक सर्जरी | = आर्चिबाल्ड. हेक्टर एम. |
| पोलिओ | = जोनास साल्क. |
| चेचक (Smallpox) | = एडवर्ड जेनर. |
| एक्स-रे | = विलहेल्म रॅनजेन. |
| इन्सुलिन | = फ्रेडरिक बँटींग, चार्ल्स एच. बेस्ट. |
| क्विनाइन (मलेरियावरील औषध) | = पिएरा जोसेफ. |
| स्टेंट हार्ट | = ज्युलिओ पाल्माझ. |
| प्लास्टर | = पॉल बेयर्सडॉर्फ. |
| अॅनेस्थेटिक | = विल्यम मार्टन. |
| अँथ्रॉक्स | = लुई पाश्चर. |
| अँटीसेप्टिक | = जोसेफ लिस्टर. |
| कृत्रिम हृदय | = डेंटन कूली. |
| कृत्रिम कंबरेचा सांधा | = जॉनचार्नली. |
| त्वचा | = जॉन एफ. लोनिस. |
| गर्भ निरोधक गोळ्या | = ग्रेगरी पिंकस. मिन चच. |
| ब्लड ट्रान्सफ्यूजन | = थॉमस ब्लुंडेल. |
| कॉन्टॅक्ट लेन्स | = अॅडॉल्फ फिक. |
| कफ ड्रॉप्स | = जेम्स स्मिथ. |
| सिरिंज | = कॉलिन मर्डोक. |

हे पोस्ट करण्याचे कारण म्हणजे ख्रिस्ती धर्माने जगासाठी काहीही केले नाही असे म्हणणाऱ्या त्या इतर समुदायांना उत्तर देणे होय. कोणाचे योगदान आहे व कोणाचे नाही हे प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे.

एकट्या माणसामध्ये आणि जगात ख्रिस्ताचे सामर्थ्य पाहण्यासाठी डोळे उघडावेत.

नहेम्या बायबल कॉलेजेस
चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
1969 to 2026 ECHO OF HIS CALL SINCE 1965
प्रवेशा करिता त्वरा करा !
ईश्वरविद्या डिप्लोमा & Bachelor of Theology
माध्यम : तमिळ (अर्धवेळ) हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५६ वर्षांपासून मान्यता प्राप्त
* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. शाखा चर्च : संतोषपुरम, बालाजी नगर आणि वेलाचेरी
७. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
८. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
९. महासभा
१०. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
११. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
१२. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१३. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१४. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१५. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१६. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१७. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१८. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**२१. तमिळ आणि इंग्रजी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२२. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२३. स्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२४. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२५. शिष्यत्त्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२६. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२७. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२८. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२९. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
३०. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३१. उपवास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३२. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३३. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्री १० वाजता (फोन द्वारा)
३४. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३५. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल

### टपाल द्वारे धर्म शास्त्राचे अभ्यासक्रम

केवळ भारतातील उमेदवारां करीता

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभुत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अशिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. **'सर्टफिकेट इन मिनिस्ट्री'** प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

*अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -*

अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् अॅप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | : **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : **1023 2923 805** |
| **Bank Name** | : **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## जे त्याच्यावर भरवसा ठेवतात, त्यांच्यावर देवाची कृपा सदैव आहे!

**''......यहोवावर भरवसा ठेवतो त्याला प्रेमदया वेढील'' - स्तोत्र ३२:१०.**

बालपणापासून अनुभवलेल्या विविध घटनांतून, मग ते चांगलेही होते व वाईटही, त्यांनी मला सतत स्मरण करून दिले की, सर्वशक्तिमान परमेश्वर माझ्यासोबत आहे आणि माझ्या जीवनात काहीतरी मोठे कार्य पार पाडण्यासाठी तो तयारी करीत आहेत.

देवासाठी मी करीत असलेल्या शुभवर्तमानाच्या सेवेमध्ये सहकार्य मिळवण्यासाठी मी अनेकांकडे गेलो, पण कोणीही माझ्याबरोबर सहभागी होण्यास तयार नव्हते. तरीही, देवाची कृपा मला पुढे जाण्यास उद्युक्त करत राहिली. जरी माझ्याकडे येशू ख्रिस्ताबद्दल पुरेसे ज्ञान नव्हते किंवा सेवाकार्याचा अनुभव कमी होता, तरीही मला त्या लोकांना मदत करण्याची तीव्र इच्छा होती, जे या जगाच्या ओझ्याखाली दबले होते.

मोठ्या अडचणींनंतर मी 'ॲकॉर्डियन' नावाचे वाद्य विकत घेऊ शकलो, ज्याची किंमत ७५० रुपये होती. ते वाद्य वाजवून आणि त्यावेळी मला माहित असलेली काही गाणी गाऊन, मी चेन्नईतील चेपॉक येथील गरीब वस्त्यांना भेट देत असे. विशेष म्हणजे, आज आमची मुख्य मंडळी आणि कार्यालय जिथे आहे तेच हे ठिकाण आहे! दिवसा सरकारी कार्यालयात मी नोकरी करीत असे, पण त्याचबरोबर चेपॉक परिसरातील रस्त्यावर प्रचारकार्यही करीत असे. माझ्या सहकाऱ्यांना माझ्याबद्दल आश्चर्य वाटत असे आणि ते अनेक वेळा मी प्रचार करीत असलेले सत्य ऐकण्यासाठी पुढे येत असे.

अत्यंत आश्चर्याची बाब अशी की, मी रस्त्यावर वचन सांगत असताना घरात आजारपणाने पडून असलेल्या लोकांना आरोग्य प्राप्त होऊन ते बाहेर येत आणि माझ्याजवळ उभे राहत असे. काही प्रसंगी ते माझ्या जवळ उभे असतानाच मूर्च्छित होऊन पडत असे, आणि हे पाहून उपस्थित लोक भयभीत होऊन पळून जात असे. ते पाहून मलाही धक्का बसत असे. जे मूर्च्छित झाले होते ते अरुंद गल्ल्यांत माशांसारखे रांगेत पडलेले दृश्य आजही माझ्या डोळ्यांसमोर आहे. अशा सेवेमध्ये मला कोणतेही औपचारिक प्रशिक्षण किंवा अनुभव नसल्यामुळे, पुढे काय करावे हे न समजता मी अवाक् होऊन उभा राहत असे.

अशा प्रसंगी पवित्र आत्म्याने मला त्या लोकांवर हात ठेवून मनापासून कळकळीने प्रार्थना करण्याची प्रेरणा दिली. मी त्याची आज्ञा पाळली, आणि प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने प्रार्थना करताच ते बरे झाले व सैतानाच्या बंधनातून मुक्त झाले. या प्रारंभीच्या अनुभवांमुळे मला मोठ्या प्रमाणात बळ मिळाले आणि देवाविषयीचे माझे प्रेम अधिकच गहिरे झाले.

आज, अनेक वर्षांनंतर, देवाने त्याच लोकांपैकी काहींना आमच्या मंडळीमध्ये येण्याची संधी दिली आहे. त्यांपैकी काहीजण आता सेवाकार्यात सक्रियपणे सहभागी झाले आहेत. यानंतर प्रभूने मला त्याच भागात मोठ्या सुवार्ता सभा आयोजित करण्याची संधी दिली, जिथे त्याने महान आणि सामर्थ्यशाली चमत्कार केले. आजही अनेक आजारी व अपंग लोकांना बरे करण्यासाठी, तसेच अंधकाराच्या शक्तींनी दीर्घकाळ बांधून ठेवलेल्या लोकांना मुक्त करण्यासाठी देव माझा उपयोग करीत आहे.

काही वर्षांपूर्वी देवाच्या सहाय्याने मला चेन्नईजवळील कांचीपूरम येथे अशाच प्रकारच्या खुल्या मैदानातील सभांचे आयोजन करता आले. प्रभूने मला त्या संपूर्ण परिसरात सुवार्तेचा प्रचार करण्यास सक्षम केले. कधी काळी मी ज्या लहान ठिकाणी सेवा केली, ती प्रभू मला आठवण करून देतो; आणि आज तो मला व्यापक स्तरावर सेवा करण्याची कृपा पुरवीत आहे.

त्याच्या पवित्र नावाला गौरव असो!

*************

(पान ४ वरुन)

पण नंतर ताण आणि थकव्याला सामोरे जातो. येशू ख्रिस्ताने सौम्य शब्दांत तिची चूक सुधारली: **''मार्थे, मार्थे, तू पुष्कळ गोष्टींविषयी चिंताक्रांत व घाबरी आहेस, परंतु थोड्या गोष्टींचे, किंवा एकाच गोष्टीचे अगत्य आहे; आणि मरीयेने चांगला वाटा निवडून घेतला आहे, तो तिच्यापासून काढून घेतला जाणार नाही''** - लूक १०:४१-४२.

मार्थाने चुकीच्या गोष्टींना प्राधान्य दिले, आणि परिणामी ती थकून गेली. २०२६ मध्ये प्रभू आपल्याला योग्य रीतीने प्राधान्यक्रम ठरवण्यास मदत करो, जे खरोखर महत्त्वाचे आहे ते निवडता यावे आणि थकवा टाळता यावा.

### २. चुकीची ओळख!

आपले कार्य आणि आपली ओळख यांची गल्लत झाली की अतिथकवा उद्भवतो. कामालाच आपण आपली किंमत मानतो, आणि सेवेलाच आपल्या मूल्याचे मापदंड बनवतो. आपण आपले वेळापत्रक भरून टाकतो, यशाच्या मागे लागतो, आणि कधी कधी इतरांशी तुलना व स्पर्धा करतो.

पण आपले मूल्य आपल्या यशावरून ठरत नाही, तर ते ख्रिस्ताकडून मिळते.

आपली ओळख आपली मालमत्ता, पद, किंवा जगाच्या निकषांमध्ये नाही; आपली ओळख केवळ ख्रिस्तामध्ये आहे.

"..... **माझा देव आपल्या गौरवातल्या संपत्तीच्या प्रमाणाने तुमची सर्व गरज ख्रिस्त येशूत पुरवील**" (फिलिप्पै ४:१९).

काम महत्त्वाचे आहे; पण देवासोबतच्या आपल्या संगतीच्या किंमतीवर कधीच नाही. कोणत्याही परिस्थितीत मंडळी किंवा ख्रिस्ती संगतीकडे दुर्लक्ष करू नका.

**मोशेने हा धडा कठीण मार्गाने शिकला. नेतृत्वाच्या मोठ्या जबाबदारीमुळे मोशे थकून गेला होता, व जोपर्यंत त्याचा सासरा येथ्रोने त्याला कामे वाटून देण्याचा सल्ला दिला नाही, तोपर्यंत तो सर्व ओझे एकट्याने उचलण्याचा प्रयत्न करीत होता** (निर्गम १८). कामांचे वाटप आणि प्रशिक्षण अत्यंत आवश्यक आहेत. आपण सर्वकाही स्वतःच करावे अशासाठी आपल्याला बोलावले नाही आहे.

प्रिय मित्रांनो, देवाने आपल्याला ज्या शर्यतीमध्ये धावण्यासाठी बोलावले आहे, त्या शर्यतीसाठी तो आपल्याला आवश्यक ती कृपा पुरवतो. जर तुम्हाला थकवा जाणवत असेल किंवा ओझ्याखाली दबल्यासारखे वाटत असेल, तर स्वतः ला हा प्रश्न विचारा: "हे ओझे खरोखर देवानेच मला वाहायला सांगितले आहे का?" देवाने आपल्याला वाहण्यासाठी कधीच न दिलेली ओझी, विशेषतः एकट्याने वाहण्याचा प्रयत्न केला की अनेकदा अतिथकवा येतो.

## ३. चुकीची सहभागिता किंवा संपर्क!

देवाने आपल्याला एकाकी जीवन जगण्यासाठी कधीच निर्माण केले नाही. सुरुवातीपासूनच त्याने आपल्याला सहभागीतेसाठी घडवले आहे; त्याच्याबरोबर आणि एकमेकांबरोबर. जेव्हा सहभागिता नष्ट होते, तेव्हा त्यातून चिंता, नैराश्य आणि खोल भावनिक संघर्ष उद्‌भवू शकतात.

योग्य लोकांपासून, योग्य ठिकाणापासून आणि योग्य वेळेपासून आपला संपर्क तुटल्यामुळे अनेकदा अतिथकवा जाणवू लागतो.

**लोटने सदोममध्ये राहण्याचा निर्णय घेतला, कारण ती भूमी सुपीक व समृद्ध दिसत होती** (उत्पत्ती १३:१०). **पण त्या ठिकाणच्या लोकांची दुष्टता त्याच्या लक्षात आली नाही** (वचन १३). चुकीच्या समुदायाची निवड केल्यामुळे त्याच्या आयुष्यात विनाशकारी परिणाम घडून आले; मोठे नुकसान, हृदयद्रावक दुःख आणि तुटलेली नाती.

एकटे चालू नका. आपल्या चर्च कुटुंबाशी जोडलेले राहा. तुमचा विश्वास बळकट करणारी नाती उभारा. देवाबद्दल बोला, चहाडखोरी करू नका.

अतिथकवा पाप आहे का?

थकवा जाणवणे हे पाप नाही. मोठा विजय मिळाल्यानंतरही एलीया अत्यंत थकला आणि आक्रोश करून म्हणाला: "..... **हे यहोवा, आता पुरे झाले,.....**"– १ राजे १९:४. देवाने एलीयाला दोष दिला नाही; त्याने त्याचे सांत्वन केले, त्याला अन्न दिले आणि त्याला विश्रांती घेऊ दिली.

देव आजही आपल्याला हेच सांगतो: "**अहो जे तुम्ही कष्टकरी व ओझ्याने लादलेले आहा, ते तुम्ही सर्व माझ्याजवळ या, म्हणजे मी तुम्हांस विसावा देईन**" – मत्तय ११:२८.

त्याच्या पायांशी बसा. त्याच्या उपस्थितीमध्ये विश्रांतीचा अनुभव घ्या. तो तुमचे सामर्थ्य पुनरुज्जीवित करील.

देवाचे विश्रांतीचे वचन: "..... **माझी समक्षता तुझ्या संगती जाईल आणि मी तुला विसावा देईन**" – निर्गम ३३:१४.

येशू ख्रिस्त खऱ्या विश्रांतीचे वचन देतो: "........ **तुम्ही सर्व माझ्याजवळ या, ........ माझे जू सोयीचे व माझे ओझे हलके आहे**" – मत्तय ११:२८,३०.

## पेत्र आपल्याला आठवण करून देतो!

"**तुम्ही आपली सर्व चिंता त्याच्यावर टाका, कारण तो तुमची काळजी घेतो**" – १ पेत्र ५:७. मला टाकणे हा शब्द आवडतो, कारण त्याचा अर्थ ओझे दूर फेकणे, ते स्वतः वाहायचे थांबवणे असा होतो. आणि येशू ख्रिस्त आपल्याला पुन्हा प्रेमाने आमंत्रित करतो: "**तुम्ही एकीकडे रानातल्या जागेत चला, व थोडा वेळ विसावा घ्या......**" – मार्क ६:३१.

शांतीचा राजकुमार, येशू ख्रिस्त, या जगात आला; आपल्यासाठी तो क्रूसावर मरण पावला आणि पुन्हा जिवंत झाला, जेणेकरून आपण शांतीत जीवन जगावे आणि त्याच्या विश्रांतीचा आपण आनंद घ्यावा. तर मग, आजच आपण त्याच्यावर विश्वास का ठेवू नये?

## एक शेवटची आठवण!

***कोण मित्र येशूवाणी सारे ओझे वाहाया?***
***सर्व दुःखे तो ऐकुनी साह्य करी सोसाया;***
***त्याकडे कधी न जाता आम्ही अवमानितो,***
***शांती खरी हरवूनी शोक किती करितो!***



"**माझी समक्षता तुझ्या संगती जाईल आणि मी तुला विसावा देईन**" – निर्गम ३३:१४.

तुम्हाला विसावा मिळण्यासाठी देवाची समक्षता तुमच्यापुढे जाऊ द्या.

**येशूवर विश्वास ठेवा.**
**सर्व काही देवाकडे सोपवा.**
**त्याच्याशी बोला.**
**तो विनामूल्य देत असलेली विश्रांती स्वीकारा.**

*******

## सूचना

कृपया आमचे मोबाईल क्रमांक (+९१) ९८४१० ७१८५८, (+९१) ९८४१२७१८५८ (मुख्य क्रमांक) आपल्या मोबाईल फोनमध्ये जतन करून ठेवा.

**– संपादक**

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## OUR BANK DETAILS:

### 1. Bank : State Bank of India

| | |
|---|---|
| Branch | : **Triplicane, Chennai-5** |
| Name | : **S. Sam Selva Raj** |
| A/C No. | : **1023 2934 679** |
| IFSC | : **SBIN 00 00 249** |

SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### 2. Bank : ICICI Bank

| | |
|---|---|
| Branch | : **Anna Salai, Chennai-6** |
| Name | : **Echo of His Call** |
| A/C No. | : **6038 0502 2319** |
| IFSC | : **ICIC 000 6038** |

### 3. Bank : State Bank of India

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | |
|---|---|
| Branch | : **Triplicane, Chennai-5** |
| Name | : **Echo of His Call Educational Trust** |
| A/C No. | : **1023 2923 805** |
| IFSC | : **SBIN 00 00 249** |

## OUR QR CODE:

ECHO OF HIS CALL

Scan to pay with any UPI app

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
E.mail : sam@echoofhiscall.org

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-    आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणाऱ्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS Patrika Channel"
on 12th MARCH 2026.
If un-delivered please return to:
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

*JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**